**Dr. Kirit Somaiya**
**B.Com, FCA, Ph.D.**
*Ex-Member of Parliament*
*Member, BJP National Executive*
*Vice President, BJP Maharashtra*

**Bharatiya Janata Party**
**भारतीय जनता पार्टी**

प्रसिद्धीसाठी

जुलै २४, २००८

## २६ जुलैचा प्रलय - एक दूरचा पल्ला

**-डॉ. किरीट सोमैय्या**

मिठी नदी तीरावर, क्रांतीनगर, कुर्ला येथे आज २६ जुलैच्या प्रलयाला तीन वर्षे पूर्ण झाल्याबद्दल मिठी महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. भाजप नेता डॉ. किरीट सोमैय्या यानी अशी माहिती दिली कि ज्या १० कुटुंबांची त्या २६ जुलैच्या मिठीच्या प्रलयात संपूर्ण वाताहत झाली ती या यज्ञात सहभागी होत आहेत.

३ वर्षांपूर्वी २६ जुलै रोजी १२,००० कोटी रुपयांचे नुकसान झाले असा दावा राज्य सरकारने केला आहे. ६०० लोक मरण पावले आणि हजारो घरे उध्वस्त झाली. २६ जुलै नंतर लगेचच्या काळात अनेक समित्या, तज्ज्ञांची पाहणी, घोषणा, वचने देण्यात आली. परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर असे दिसून आले कि, “मिठीव्यतिरिक्त अन्य घोषणा, योजना यांची अजून सुरुवातही झालेली नाही.”

**बेपत्ता व्यक्ति**

२६ जुलैच्या घटनेत १३५ व्यक्ति बेपत्ता झाल्याचे जाहीर करण्यात आले होते. त्यापैकी ८२ व्यक्ति नंतरच्या काळात मृत आढळून आल्या. त्यांची पार्थिवे प्रलयाच्या क्षेत्रातून शोधून काढण्यात आली आणि त्यांच्या कुटुंबियांच्या हवाली करण्यात आली. ज्या २५ व्यक्ति अडकल्या होत्या त्या नंतर सापडल्या. २८ व्यक्ति अजूनहि बेपत्ता आहेत.

२० पार्थिवे अजूनही पोलीसांकडे ताबा न घेतल्याने पडून आहेत.

**मिठी नदीचे काम अर्धे झाले**

- मिठीच्या जीर्णोद्धाराच्या कामात दिरंगाई झाली. कंत्राटदारांनी भ्रष्ट माग्राचा अवलंब केल्याचे आढळून आले परंतु सातत्याने केलेला पाठपुरावा आणि उच्च न्यायालयाची भिती यामुळे मिठीच्या जीर्णोद्धाराच्या कामाला गति मिळाली. या ३ वर्षात, ते अर्धे झाले आहे. चालू वर्षी, एमएमआरडीएने १६.४ लाख घनमीटर गाळ काढला आहे. त्यापैकी १२.५ लाख घनमीटर विविध डंपिग ग्राउंडसमध्ये हलविण्यात आला. राहिलेला गाळ कंत्राटदार पावसाळ्यात हलविणार आहेत.
- बीएमसीने त्यांच्या क्षेत्रात येणाऱ्या मिठी नदीच्या पात्रातील गाळ काढण्याचे आणि तो वाहून नेण्याचे काम मोठ्या प्रमाणावर पूर्ण केले आहे. गेल्या ३ वर्षात जवळजवळ ८ लाख धनमीटर गाळ काढण्यात आणि वाहून नेण्यात आला आहे.

...२.

**BJP Office :** ● 11, Ashoka Road, New Delhi 110 001

➔**Please Reply :** 9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081- Tel21639649/21634152
(M)9869220027 ● Fax : 21637432 - Email: kirit@vsnl.in, neelamnagar@rediffmaill.com
Website : www.kiritsomaiya.com

*Dr. Kirit Somaiya*
**B.Com, FCA, Ph.D.**
*Ex-Member of Parliament*
*Member, BJP National Executive*
*Vice President, BJP Maharashtra*

**Bharatiya Janata Party**
**भारतीय जनता पार्टी**



- मिठी नदीच्या दोन्ही तीरांवर बांध घालण्याचे काम बीएमसीच्या क्षेत्रात सुरू झाले आहे. हे काम पुढच्या वर्षापर्यंत पूर्ण व्हावे असे बीएमसीला अपेक्षित आहे.
- मिठी नदीच्या रुंदीकरणाचे आणि पुनर्बांधणीचे काम अजून सुरू झालेले नाही. त्यासाठी जोर लावण्याची आणि गति देण्याची गरज आहे.
- मिठी नदीच्या रुंदीकरणाचे काम १९ किमीच्या पट्ट्यात केले आहे. बाकीच्या २ किमी.तील रुंदीकरण पुढच्या वर्षी पूर्ण होईल.

**इतर ५ नद्यांची कामे सुरू झालेली नाहीत.**

मुंबई महानगर क्षेत्रातील इतर मोठ्या आणि महत्त्वाच्या नद्यांची कामे अजून सुरू झालेली नाहीत. दहिसर, पोईसर, ओशिवरा, वालधुनी आणि उल्हास नद्यांमुळेसुद्धा २६ जुलैच्या प्रलयात मोठी समस्या निर्माण झाली होती. गेल्या ३६ महिन्यात राज्य सरकारने अनेक घोषणा केल्या पण या नद्यांच्या बाबतीत काहीही केलेले नाही.

**ब्रिमस्टोवाड स्थिती**

ब्रिमस्टोवाडची कथाही एक प्रकारे २६ जुलैच्या घटनेपेक्षा वेगळी नाही. काम अजून सुरू व्हायचे आहे. कृती आराखडा गेल्या वर्षी तयार करण्यात आला असला आणि निविदा प्रक्रियाही पूर्ण करण्यात आली असली तरी प्रत्य क्ष कामाला अजूनही सुरूवात नाही.

**निधीचा पुरवठा**

भारत सरकार, पंतप्रधानांनी मिठी आणि मुंबईसाठी १२० कोटी रुपये देण्याची घोषणा केली होती. गेल्या ३ वर्षात एक पैसाही देण्यात आलेला नाही. राज्य सरकारने मदकार्यासाठी केंद्र सरकारकडून १२००० कोटी रुपयांची मागणी केली होती. प्रस्ताव पूर्णपणे फेटाळण्यात आला. राज्य सरकारने मुंबईच्या पुनर्उभारणीसाठी एक पैसाही दिलेला नाही.

**मदतकार्य आणि भ्रष्टाचार**

२६ जुलैच्या संदर्भातील मदतकार्य आणि पुनर्वसनाच्या बाबतीत भ्रष्टाचाराच्या निरिक्षणाबाबतचा सीएजीचा आहवाल मिलून २ वर्षांहून अधिक काळ गेला. राज्य सरकारने एक समिती स्थापन केली होती. १५ महिन्यांपूर्वी या समितीचा अहवाल आणि कडक कारवाईच्या शिफारशी प्राप्त झाल्या. सगळे अहवाल फाइल्समध्ये धूळ खात पडले आहेत. गेल्या ३६ महिन्यात भ्रष्ट अधिकारी, कंत्राटदार, आणि तथाकथित सामाजिक कार्यकर्ते यांच्या विरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

**BJP Office :** ● 11, Ashoka Road, New Delhi 110 001

➔**Please Reply :** 9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081- Tel21639649/21634152
(M)9869220027 ● Fax : 21637432 - Email: kirit@vsnl.in, neelamnagar@rediffmaill.com
Website : www.kiritsomaiya.com